**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रकाश बाबुराव सरताळे
मु.तिसंगी, पो.सोनके,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक,**
पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००१/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/०८/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९/०९/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/०९/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** देशभक्त संभाजीराव शेंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मेडशिंगी या संस्थेमधील जानेवारी १९९५ ते ऑगस्ट २००९ पर्यंत शिक्षक कर्मचारी व सेवक भरतीबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रकाश बाबुराव सरताळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केले नसल्याने सदर अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

<u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अनंत वासुदेव गवई
१, विश्राम हौ.सो.,भगतसिंग मार्केट,
उत्तर सदर बझार, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, १ ला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
सचिव माध्व मंडळ, गणपती घाट,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००४/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/०१/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७/०३/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** माध्व मंडळ या संस्थेच्या सर्व सभासंदाची नावे, पत्ते, वार्षिक सर्व साधारण सभांची माहिती इ. | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे.

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि. १९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही', असे कार्यवाह, माध्व मंडळ, सोलापूर श्री. के. वैद्य यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. अनंत वासुदेव गवई यांनी सादर केलेले नाहीत. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मूळ अर्जदार श्री. अनंत वासुदेव गवई यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि.७/०३/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :-** 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. काशिनाथ शिवा चांदणे
कात्यायणी पार्क, कळंबे तर्फे ठाणे,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००५/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/०९/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सेवापुस्तकातील गैरहजेरीची नोंद कमी करणेबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. काशिनाथ शिवा चांदणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन दिसून येते. तसेच त्यांनी आयोगाकडे केलेले अपील हे मुदतबाहय असल्यामुळे या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

ॲड. गणेश महादेव पाटील
मु.पो.टोप, ता. हातकणंगले,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
ॲक्सीस बँकेसमोर, ढोले पाटील रोड,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
महाराष्ट्र राज्य वडार समाज संघ,
के.डी.सी.बँक मुख्य कार्यालयाजवळ,
शाहुपुरी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००६/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/११/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२/१२/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महाराष्ट्र राज्य वडार समाज संघाची घटना, कार्यकारी मंडळ, लेखापरीक्षण अहवाल इ. | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता ॲड. गणेश महादेव पाटील यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. संस्थेने अपीलकर्त्यास दिलेले उत्तर योग्य आहे. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजय हरी पाटील
मु.पो.खेबवडे, ता.करवीर,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित,
बिद्री (मौनीनगर), ता.कागल,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००७/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७/०२/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०३/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वेदगंगा सहकारी साखर कारखान्याच्या ऊस क्षेत्र नोंदणी, तोडी व वजनासंदर्भात माहिती | |

<u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. विजय हरी पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती रिना रविंद्र सुर्यवंशी
मु.पो.गलगले, ता.कागल,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
प्राथमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
प्राथमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००८/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/०१/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/०६/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** प्राथमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर मधिल लिपीक पदाच्या भरतीबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती रिना रविंद्र सुर्यवंशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) अथवा दारिद्रयरेषेखाली असल्याबाबत पुरावा जोडलेला नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामकृष्ण धोंडीबा नायकोडे
मु.पो.व ता.करमाळा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष,**
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
पुणे विभाग पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/०३/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/०४/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) सन २००७ या वर्षामध्ये सोलापूर जिल्हयातून जात पडताळणीसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची तालुकानिहाय संख्या व त्यामध्ये मंजूर /नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांचा तपशील<br>२) पोथरे, ता.करमाळा येथील जात पडताळणी संदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या मार्फत पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र पडताळणीची नक्कल प्रत मिळावी | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्याची मूळ मागणी ही जात

प्रमाणपत्र पडताळणी करुन त्याची नक्कल मिळावी अशी असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, तसेच अपीलकर्त्याने सोलापूर जिल्हयातील जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भातील प्रस्तावाबाबत मागणी केलेली माहिती ही अत्यंत व्यापक स्वरुपाची असल्याने या कामासाठी सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागून त्याचा परिणाम दैनंदिन कामकाजावर झाला असता त्यामुळे अपीलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ७ (९) अन्वये माहिती देण्यात आली नाही', असे जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, श्री. प्रमोद जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचे प्रतिनिधी श्री. प्रकाश पाटील, उप आयुक्त (सा.प्र.) यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रकाश हनुमंत पाटील
बसवराज नंदुरेवाडा,
मु.पो.बासलेगांव, ता.अक्कलकोट,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद रायगड,
अलिबाग

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद रायगड,
अलिबाग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२१/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/०१/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/०३/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/०२/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्रीमती छाया शंकर बनसोडे मु.पो बोराळे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर यांना सन १९९४ साली डी. एड. साठी पनवेल येथे मिळालेल्या प्रवेशाच्या संदर्भातील कागदपत्रे | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्याने मागणी केलेली कागदपत्रे सन १९९३-९४ व १९९४-९५ या वर्षाच्या डी. एड. प्रवेशासंदर्भातील असून, सदरची कागदपत्रे 'ड' वर्गात वर्गीकरण करण्यात येऊन नष्ट करण्यात आली असल्याचे व त्याबाबत रेकॉर्ड रजिस्टर मधील अ.क्र.५१० व ५३८ वर नोंद घेण्यात आली असल्याचे', जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), श्री.आर. डी. जोशी व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, रायगड, श्री. व्ही. आर. जाधव यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. महादेव रामचंद्र माने
१४/६४, इचलकरंजी.
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, हातकणंगले,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
अरिहंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
विठ्ठल मंदिराजवळ, गुजरी कॉर्नर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२२/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/०१/२०१० |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/०३/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. महादेव रामचंद्र माने यांच्या कर्जाचा उतारा, कोडीग्रे, ता.शिरोळ, येथील गट नं. १९१ मधील जमिनीच्या व्यवहाराबाबतची कागदपत्रे व तपशील | |

## विवेचन

नागरी सहकारी पतसंस्था व नागरी सहकारी बँका यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सिद्राम माणिक गडमिरे
द्वारा श्री.आर.आर.गडमिरे,
१०४, पश्चिम मंगळवार पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, १ ला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिवगंगा नवरात्र महोत्सव तरुण मंडळ,**
१/२, भवानी पेठ, मराठा वस्ती,
सोलापूर-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/०२/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/०६/२००७ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/०३/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शिवगंगा नवरात्र महोत्सव तरुण मंडळाची स्थावर व जंगम मालमत्ता, मालमत्तेची खरेदी विक्री, कर्जे इ. ६ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. सिद्राम माणिकराव गडमिरे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या दि. ११/०३/२००८ रोजीच्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील अमान्य करण्यात येत आहेत.

२) श्री. सिद्राम माणिकराव गडमिरे यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि. ११/०३/२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :-** 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश कृष्णाजी असलेकर
रविवार पेठ, देवदास हॉटेल जवळ, मु.पो.ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ३२९ यादोगोपाळ पेठ,
राजधानी टॉवर्स, तिसरा मजला, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ३२९ यादोगोपाळ पेठ,
राजधानी टॉवर्स, तिसरा मजला, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२४ / २००९ / २ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश कृष्णाजी असलेकर
रविवार पेठ, देवदास हॉटेल जवळ, मु.पो.ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ३२९ यादोगोपाळ पेठ,
राजधानी टॉवर्स, तिसरा मजला, सातारा प्रतिनिधी श्री.तानाजी गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ३२९ यादोगोपाळ पेठ,
राजधानी टॉवर्स, तिसरा मजला, सातारा श्री.सदाशिव हरी राऊत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.४.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.७२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.७.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

रंगशीला देवस्थान ट्रस्टबाबत आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, सातारा यांनी विहित मुदतीत दिली नाही. सन २००५-२००६ च्या लेखा तपासणी अहवालाची प्रत दिली नाही. माहिती अपुरी व विलंबाने मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश कृष्णाजी असलेकर यांनी केली.

अपीलकर्ता श्री.असलेकर यांनी याच न्यासाच्या संदर्भात आणखी एक अर्ज केला होता. त्यावेळी कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांच्याकडे अपील केले. अन्य कामानिमित्त ते कार्यालयात आले असताना सर्व माहिती त्यांना नि:शुल्क देण्यात आली. न्यासाने आपल्या कार्यालयाकडे दाखल केलेली सर्व माहिती देण्यात आली आहे. लेखा तपासणी अहवाल आदी सादर करण्याबाबत नियमानुसार प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, सातारा श्री.सदाशिव हरी राऊत व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.तानाजी गायकवाड यांनी केले. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. लहू संतू कांबळे
रा. इरिगेशन बंगला, मु. पो. कोळकी,
ता. फलटण, जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, फलटण ता. फलटण, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कोळकी, ता.फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२९ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २०.११.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. लहू संतू कांबळे<br>रा. इरिगेशन बंगला, मु. पो. कोळकी,<br>ता. फलटण, जि. सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),<br>पंचायत समिती, फलटण ता. फलटण, जि. सातारा श्री. रमेश दामु काळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत कोळकी, ता.फलटण, जि. सातारा श्री. विजय विनायक निंबाळकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.८.२००९ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

माहिती म्हणून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कोळकी, ता. फलटण, जि. सातारा यांनी आपल्याला एक कागद पाठविला. तसेच अपुरी व वाचता न येण्यासारखी माहिती टपालाने पाठविली, असे निवेदन अपीलकर्ता श्री. लहु संतू कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केले आहे.

श्री. कांबळे यांनी दि. १०.६.२००९ रोजी अर्ज केला. माहिती घेऊन जाण्याबाबत त्यांना सांगितले असता त्यांनी नेली नाही, म्हणून टपालाने पाठविली. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दरम्यानही हे स्पष्ट केले होते. माहिती देऊ केली असता श्री. कांबळे यांनी घेतली नाही, म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, फलटण, ता. फलटण, जि. सातारा यांच्या आदेशानुसार रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कोळकी, ता. फलटण, जि. सातारा श्री. विजय विनायक निंबाळकर यांनी केले. याबाबत आपण खात्री करुन घेतली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. रमेश दामु काळे यांनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आलेली आहे. अपीलकर्त्याच्या अर्जात असलेल्या भाष्याचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामचंद्र दशरथ नागणे
मु.पो.महूद बुद्रुक, ता.सांगोला,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती सांगोला,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,**
पंचायत समिती सांगोला,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक. | १०३०/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्रीमती संगीता रामचंद्र नागणे यांच्या सेवानिवृत्ती उपदाना-संदर्भातील वारसा नोंदीची माहिती व श्री. हनुमंत सदाशिव पवार यांच्या नेमुणक आदेशांची सांक्षाकित प्रत इ. एकुण ८ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रामचंद्र दशरथ नागणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तरिही राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. नागणे हे अनुपस्थित होते.अपीलकर्त्याच्या मागणीनुसार त्यांना

त्यांना मुद्दा क्र.१ ते ५ व मुद्दा क्र. ७ व ८ ची माहिती प्रमाणित करुन देण्यात आलेली आहे. माहिती - मागणी अर्जातील मुद्दा क्र. ६ ची माहिती कार्यालयीन अभिलेखामध्ये उपलब्ध नसल्याने ती देण्यात आलेली नाही', असे जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सांगोला, श्री. बी. एन. जगधने व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, श्री.जे. आर. अडसूळ यांनी अपीलकर्त्याच्या पोहोचेसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं.१५४, सेक्टर १९,
कोयनानगर, चिंचवड,
पुणे-१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता,**
पिंपरी -चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (अ प्रभाग),**
पिंपरी -चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३१/२०१०/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिल दामोधर माळी
मु.पो.ता.मोहोळ, नागनाथ गल्ली,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३४/२०१०/सोलापूर |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. सुनिल दामोधर माळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहितो अधिका-यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010